क्रमांक : ज्येसू-१५२४/सांस-ता-अं-२४/२२५/प्रशा-२/ १५०८
अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन,
प्रशासकीय इमारत, आठवा मजला,
मुंबई उपनगर जिल्हा, वांद्रे (पूर्व), मुंबई - ५१.
दिनांक : ०४/१२/२०२४

**परिपत्रक**

**विषय :- सांख्यिकी सहायक, गट-क संवर्गात दिनांक १/१/२०२३ ते ३१/१२/२०२३ या कालावधीत नियमित/तात्पुरत्या स्वरुपात नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांची दिनांक १/१/२०२४ रोजीची तात्पुरती ज्येष्ठतासूची प्रसारीत करणेबाबत.**

संदर्भ :- (१) सामान्य प्रशासन विभाग, शासन अधिसूचना क्रमांक एसआरव्ही २०१६/प्र.क्र.२८१/बारा, दिनांक २१/६/२०२१
(२) सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक एसआरव्ही २०१६/प्र.क्र.२८१/कार्या-१२, दिनांक १३/७/२०२१

महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली, २०२१, सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना, दिनांक २१ जून २०२१ नुसार संचालनालयाच्या सांख्यिकी सहायक, गट-क संवर्गातील कर्मचाऱ्यांची दिनांक १/१/२०२३ ते ३१/१२/२०२३ या कालावधीत नियमित/तात्पुरत्या स्वरुपात नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांची दिनांक १/१/२०२४ रोजीची तात्पुरती ज्येष्ठतासूची संचालनालयाच्या http://mahades.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसारीत केली आहे.

२/- या परिपत्रकान्वये सर्व संबंधित कर्मचाऱ्यांना कळविण्यात येते की, उपरोक्त संकेतस्थळावर प्रसारीत केलेल्या तात्पुरत्या ज्येष्ठतासूचींबाबत त्यांचे काही वास्तविक आक्षेप अथवा त्रुटी (नांव, जन्मदिनांक, प्रवर्ग, रुजू दिनांक, ज्येष्ठता इत्यादी) असल्यास ते आक्षेप / त्रुटी हे परिपत्रक निर्गमित झालेल्या दिनांकापासून १५ दिवसाच्या आत संचालनालयाकडे त्यांच्या कार्यालयप्रमुखामार्फत पाठवावेत व एक आगाऊ प्रत संचालनालयास परस्पर पाठविण्यात यावी. आक्षेप कळविताना आपला ज्येष्ठताक्रम आक्षेपात नमूद करावा. जन्मदिनांक तद्वतच जातीच्या प्रवर्गासंबंधी आक्षेप असल्यास सेवापुस्तकाच्या पहिल्या पृष्ठाची, शाळा सोडल्याच्या दाखल्याची व जातीचे प्रमाणपत्र/जातीचे वैधता प्रमाणपत्र यांची साक्षांकित प्रत अर्जासोबत संचालनालयास पाठविण्यात यावीत. मुदतीनंतर पाठविण्यात आलेले आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

३/- ज्या कर्मचाऱ्यांची जाती दावा पडताळणीची प्रकरणे प्रलंबित आहेत/जाती दाव्याची पडताळणी झालेली नाही अशा कर्मचाऱ्यांच्या जाती दावा पडताळणीचा निर्णय प्राप्त होईपर्यंत त्यांची ज्येष्ठता अस्थायी स्वरुपातील असून त्यांच्या ज्येष्ठता सूचीतील जातीच्या नोंदी जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडून जात वैधता प्राप्त होईल या अटीस राहून नोंदविल्या आहेत.

४/- सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्रमांक बीसीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दिनांक ७/५/२०२१ नुसार मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र.२७९७/२०१५ या प्रकरणी दिनांक ४/८/२०१७ रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीतील आरक्षण अवैध ठरविले असल्याने व मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाच्या या निर्णयास अद्याप स्थगिती दिलेली नसल्याने पदोन्नतीच्या कोट्यातील सर्व रिक्त पदे दिनांक २५/५/२००४ च्या स्थितीनुसार सेवाज्येष्ठतेने भरण्याबाबत दिलेल्या मार्गदर्शनपर सूचनेनुसार निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात भरण्यात येतात. त्यामुळे याबाबत अंतिम आदेश प्राप्त झाल्यानंतर प्रकरणपरत्वे सदर ज्येष्ठतासूचीतील कर्मचाऱ्यांच्या ज्येष्ठताक्रमामध्ये बदल होऊ शकतो, याची नोंद घ्यावी.

५/- .प्रस्तुत परिपत्रक मिळाल्याची पोच उलट टपाली संचालनालयास संबंधित कार्यालयामार्फत पाठविण्यात यावी.

(नि.म.प्रभुदेसाई)
उप संचालक (प्रशासन)
अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई.

प्रति,
श्री./श्रीमती ---------------------------------------
सांख्यिकी सहायक
---------------------------------------------------
---------------------------------------------------

कृ.मा.प.

d:\chhaya\ज्येष्ठतासूची\ज्येष्ठतासूची परिपत्रक.docx- ८९ -

प्रत :

१. सह संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, प्रादेशिक कार्यालय (सर्व) - सदरचे परिपत्रक सांख्यिकी सहायक संवर्गातील कर्मचाऱ्यांना देण्यात यावे व त्याबाबतची पोच त्यांच्याकडून घेऊन संचालनालयास पाठविण्यात यावी.

२. उपसंचालक, जिल्हा सांख्यिकी कार्यालय (सर्व) - सदरचे परिपत्रक जिल्हा सांख्यिकी कार्यालय तसेच जिल्ह्यातील या यादीत समाविष्ट नसलेल्या इतर कार्यालयातील सांख्यिकी सहायक संवर्गातील कर्मचाऱ्यांना देण्यात यावे व त्याबाबतची पोच त्यांच्याकडून घेऊन संचालनालयास पाठविण्यात यावी.

३. कक्ष अधिकारी (का-१४२६), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.

**संवर्गाचे नाव :- सांख्यिकी सहायक**

**वेतनश्रेणी :- S-१० : २९२००-९२३००**

**दिनांक १ जानेवारी, २०२३ ते ३१ डिसेंबर, २०२३ या कालावधीची तात्पुरती ज्येष्ठतासूची**

| नियम ३ (२) (ब) नुसार ज्येष्ठता क्रमांक | शासकीय कर्मचाऱ्याचे नांव | नियुक्तीचा मार्ग | जन्म दिनांक | प्रवर्ग | नियम ३ (२) (अ) नुसार संवर्गात प्रत्यक्ष रुजू दिनांक | ज्येष्ठतेचा दिनांक | सेवानिवृत्तीचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | श्री.रवी विजयसिंग राजपूत (श्री.रवि विजयसिंग सिंगल) | ना | १८-१२-१९८७ | विजा अ | १९-०९-२०१५ | ०७-१०-२०२३ | ३१-१२-२०४५ | ज्येष्ठता पुर्ननिश्चित अतिरिक्त संधीत उत्तीर्ण |
| २ | श्रीमती प्रतिभा दिनेश जाधव | प | २८-१२-१९७५ | | १५-०७-२०१६ | ०७-१०-२०२३ | ३१-१२-२०३३ | ज्येष्ठता पुर्ननिश्चित अतिरिक्त संधीत उत्तीर्ण |
| ३ | श्री.प्रकाश श्रीरंग जाधव | प | २५-१०-१९७६ | विजा-अ | ११-०७-२०१६ | ०७-१०-२०२३ | ३१-१०-२०३४ | ज्येष्ठता पुर्ननिश्चित अतिरिक्त संधीत उत्तीर्ण |
| ४ | श्री.राजेश सुखदेव कड | प | १०-१०-१९७५ | इमाव | ०५-०७-२०१६ | ०७-१०-२०२३ | ३१-१०-२०३३ | ज्येष्ठता पुर्ननिश्चित अतिरिक्त संधीत उत्तीर्ण |
| ५ | श्री.विकास कामाजी गादगे | ना | १४-०१-१९८९ | अज | ११-०७-२०१६ | ०७-१०-२०२३ | ३१-०१-२०४७ | ज्येष्ठता पुर्ननिश्चित अतिरिक्त संधीत उत्तीर्ण |
| ६ | श्रीमती अश्विनी अशोक विहुलेकर | प | २१-११-१९७४ | अजा | ०९-११-२०१६ | ०७-१०-२०२३ | ३०-११-२०३२ | ज्येष्ठता पुर्ननिश्चित अतिरिक्त संधीत उत्तीर्ण |
| ७ | श्री.दिनेश जगन्नाथ गढरी | प | १६-०४-१९८८ | भज क | ०९-११-२०१६ | ०७-१०-२०२३ | ३०-०४-२०४६ | ज्येष्ठता पुर्ननिश्चित अतिरिक्त संधीत उत्तीर्ण |
| ८ | श्रीमती कविता श्रीकृष्ण इंगळे | ना | ०१-११-१९८४ | | ०६-०४-२०१७ | ०७-१०-२०२३ | ३१-१०-२०४२ | ज्येष्ठता पुर्ननिश्चित अतिरिक्त संधीत उत्तीर्ण |

- ना-नामनिर्देशन
- प-पदोन्नती

(नि.म.प्रभुदेसाई)
उप संचालक (प्रशासन),
अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई.